महावितरण

महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : १० ■ फेब्रुवारी २०२४ ■ पाने : ८

राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील ऐतिहासिक बदलाचे पाऊल

राज्यातील २ कोटी ४० लाख घरगुती वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्याची तयारी आता जवळपास पूर्ण झाली आहे. लवकरच प्रत्यक्ष स्मार्ट मीटर बसविण्यास सुरुवात होत आहे. पारंपरिक वीज मीटर काढून त्या ऐवजी स्मार्ट मीटर बसविणे हा राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील ऐतिहासिक बदल ठरणार आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना वीज वापरावर आणि बिलाच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होणार आहे व त्याचबरोबर महावितरणचे अर्थकारण मुळापासून बदलून त्याचा लाभ ग्राहकांनाच होणार आहे.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या पाठिंब्याने राज्यात आरडीएसएस ही विजेच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. त्याचा एक भाग म्हणून स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात आरडीएएस योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येत आहे. स्मार्ट मीटरच्या सुविधेचा वीज ग्राहकांना लवकरात लवकर लाभ झाला पाहिजे, असा मा. उपमुख्यमंत्र्यांचा आग्रह आहे.

स्मार्ट मीटर ग्राहकांसाठी वरदान

स्मार्ट मीटर हे वीज ग्राहकांसाठी वरदान ठरणार आहेत. स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकांना प्रीपेडची सुविधा उपलब्ध आहे. त्यांनी आपल्या बजेटनुसार आधी पैसे भरायचे व त्यानुसार वीज वापरायची अशी सुविधा आहे. प्रीपेड मोबाईल फोनसारखी ही सुविधा आहे. ग्राहकांना प्रीपेड मोबाईल फोनची आता सवय झाली आहे, त्यामुळे स्मार्ट मीटर बसविल्यावर विजेच्या खर्चापोटी पैसे देणे अवघड जाणार नाही. ग्राहक जेवढे पैसे भरतील तेवढी वीज त्यांना मिळेल. परिणामी त्यांना विजेच्या खर्चावर नियंत्रण ठेवता येईल. ग्राहकांना महिन्याच्या वापराचे पैसे एकदम भरण्याचीही आवश्यकता नाही. ते थोडे थोडे पैसे भरून वीज वापरू शकतात.

सध्याच्या पद्धतीत ग्राहकांनी वीज वापरल्यानंतर त्यांना बिल पाठविले जाते व कधी कधी अपेक्षेपेक्षा जास्त बिल आल्याची तक्रार ग्राहकांकडून येते. पण विजेचा वापर झालेला असल्याने त्यानुसार बिल भरण्याशिवाय पर्याय नसतो. स्मार्ट मीटरच्या बाबतीत ही समस्या कधी येणार नाही. स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना त्यांच्या मोबाईल फोनवर नियमितपणे त्यांच्या घरी किती वीज वापर होत आहे व त्यांनी भरलेल्या पैशांपैकी किती शिल्लक आहेत, हे समजत राहील.

स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना आपला वीज वापर समजत राहण्याचा एक महत्त्वाचा उपयोग आहे. विजेचा वापर अपेक्षेपेक्षा जास्त होत असल्याचे वेळीच समजल्यामुळे ग्राहकाला त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

थोडक्यात विजेच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आणि विजेचा खर्च आपल्याला हवा तेवढा नियंत्रित

हितगूज



श्री. लोकेश चंद्र
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

ठेवणे या दोन महत्त्वाच्या सुविधा वीज ग्राहकाला स्मार्ट मिटरमुळे मिळणार आहेत. त्यासोबत आपल्या सोईनुसार टप्प्या टप्प्याने वीज बिलही देण्याचीही सुविधा आहे.

महावितरणकडून वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर मोफत मिळणार आहेत. स्मार्ट मीटर बसविणाऱ्या कंपनीकडून दहा वर्षे देखभाल करणे बंधनकारक आहे. त्यामुळे या कालावधीत यदाकदाचित मीटर बिघडला तरी त्याचा भार वीज ग्राहकावर येणार नाही.

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर जर खात्यातील पैसे संपले तर अचानक रात्री अपरात्री वीज पुरवठा खंडित होणार नाही. रात्रीच्या वेळी अचानक खात्यातील पैसे संपले तरीही वीजपुरवठा चालू राहील व दुसऱ्या दिवसापर्यंत ग्राहकाला खात्यात प्रीपेडचे पैसे भरता येतील. मधल्या कालावधीत खात्यातील पैसे संपल्यानंतर वापरलेल्या विजेचे पैसे वजा होतील इतकेच. जेव्हा खात्यातील पैसे संपत येतील तेव्हा मोबाईल फोनप्रमाणे ग्राहकांना सातत्याने संदेश पाठवून सावध केले जाणार आहे, त्यामुळे अचानक पैसे संपले अशी समस्या बहुधा येणार नाही.

राज्यात विजेचे जे स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत, त्यांचे तंत्रज्ञान सिद्ध झालेले आहे. देशात आसाम, बिहार, मध्य प्रदेश व जम्मू काश्मीर येथे काही ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत व तेथील वीज ग्राहकांचा अनुभव खूप चांगला आहे. या राज्यांमधील वीज ग्राहकांनी प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर त्यांना स्मार्ट मीटरचा उपयोग ध्यानात आला.

महावितरणमध्ये महत्त्वाचा बदल

राज्यातील कृषी ग्राहक वगळता इतर वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्यात येणार आहेत. या मीटरमुळे विजेच्या बिलाची थकबाकी आणि बिलांची वसुली ही समस्या इतिहासजमा होणार आहे. ग्राहक विजेचे बिल आधीच देणार असल्याने महावितरणकडे नियमितपणे पैसे येत राहतील व त्याचा वापर कंपनी ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठ्यासाठी करू शकते. महावितरणच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के निधी हा विजेची खरेदी आणि महावितरणच्या उपकेंद्रापर्यंत वीजवहनासाठी खर्च होतो, हे ध्यानात घेतले तर राज्यात नियमित वीज पुरवठ्यासाठी बिलांच्या वसुलीचे महत्त्व किती आहे हे स्पष्ट होते.

स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना नियमितपणे त्यांच्या वीज वापराची माहिती मिळणार असल्याने सध्या बिल आल्यानंतर त्यांच्याकडून कधी कधी येणाऱ्या वाढीव बिलाच्या तक्रारी, मीटर खराब असल्याच्या किंवा रिडिंग योग्य नसल्याच्या तक्रारी हे सर्व बंद होईल. यामुळे ग्राहक अधिक संतुष्ट राहतील. ग्राहकांचे समाधान हा महावितरणचा मोठाच लाभ आहे.

स्मार्ट मीटरच्या माध्यमातून राज्यभरातील वीज ग्राहकांचा वीज वापर, त्यात होणारा बदल, त्यांच्याकडून होणारा बिलाचा भरणा इत्यादी माहिती नियमितपणे उपलब्ध होणार आहे. या माहितीचे विश्लेषण करून महावितरणला आपली वितरण यंत्रणा अधिक प्रभावी करता येणार आहे. एकूणच स्मार्ट मीटर बसविणे हा राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील ऐतिहासिक बदल ठरणार आहे. महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याबाबत जागृती निर्माण करावी, असे माझे आवाहन आहे. ■

सोमेश्वर उपविभागाची नेत्रदिपक कामगिरी
''सबका साथ परिस्थितीवर मात''



ग्राहकांशी संवाद साधताना कर्मचारी व अधिकारी

बारामती तालुक्यात महावितरणचे तीन उपविभाग आहेत. त्यापैकी एक सोमेश्वर. हा परिसर सधन असून, ऊस हे येथील प्रमुख पीक आहे. सोमेश्वरनगर कारखाना त्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे शेतीच्या विजेची मागणी वाढत आहे. मात्र कनेक्शनची संख्या स्थिर झाली होती. दरम्यानच्या सात महिन्यांपूर्वी उपकार्यकारी अभियंता श्री. संतोष चव्हाण बदलीवर रुजू झाले. यापूर्वी त्यांनी भोर सारख्या दुर्गम तालुक्यात चांगले काम केले होते. सोमेश्वरलाही त्यांनी वेगळा प्रयोग राबविण्यास सुरुवात केली.

सोमेश्वर उपविभागामध्ये ६ शाखा कार्यालये असून त्यांतर्गत ३० गावे येतात. या गावांना ८ उपकेंद्रांद्वारे वीजपुरवठा होतो. उपविभागात घरगुती २२,४६३ व कृषीच्या १४,७०० जोडण्यांसह एकूण ४०,०७८ वीज जोडण्या आहेत. त्यासाठी कायमस्वरुपी व कंत्राटी असे मिळून १०५ कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ कार्यरत आहे.

ग्राहकांनी आपल्यापर्यंत येण्यापेक्षा आपणच ग्राहकांपर्यंत पोहचायचे असे ठरवून श्री. चव्हाण यांनी दोन महिन्यांपूर्वी 'गतिमान वीज जोडणी अभियान' उपविभागात राबविण्याचा मनोदय केला. याकरिता सर्वच कर्मचाऱ्यांना एकत्र आणून त्यांनी योजना समजावून सांगितली. प्रत्येक ग्राहकांचे फेर सर्व्हेक्षण करुन त्यांच्या त्रूटी दूर करायच्या आणि बिलींग अचूक करायचे असे ठरवले.

जनमित्रांपासून ऑपरेटरपर्यंत सर्वच कर्मचाऱ्यांनी यात सहभाग नोंदवला. नवीन कनेक्शनची प्रक्रिया सुलभ करुन ती प्रथम जनमित्रांना समजावून सांगितली व त्यांच्यामार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचवली. गावात जेवढी घरे आहेत, तेवढी कनेक्शन्स आहेत का? याची खात्री केली. कर्मचाऱ्यांनीही आपली दैनंदिन कामे करुन जमेल तेवढ्या ग्राहकांच्या बांधावर, घराला भेट देण्यास सुरु केली. यामध्ये १,२०० हुन अधिक हूक आढळले. त्यासर्वांना कनेक्शन घेण्यास प्रवृत्त केले. कोटेशनची रक्कम नियमानुसार पण कमीत कमी मर्यादेत ठेवली आणि ऑनलाईन अर्ज भरुन घेतले. परिणामी दोन महिन्यांत घरगुतीची १,३६८ तर शेतीची ९४० कनेक्शन वाढली. तर अतिभारीत रोहित्रावरील हूक काढल्यामुळे व शेतीपंपांना कॅपॅसिटर बसविल्यामुळे रोहित्र जळण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. नवीन जोडण्यामुळे ४,००० अश्वशक्तीचा भार अधिकृत झाला तर २८८ ग्राहकांचा १,६१० अश्वशक्तीभार नव्याने वाढला. हे फक्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्यामुळेच शक्य झाले.

जनसंपर्कासाठी सोशल मिडियाचा प्रभावी वापर

उपकार्यकारी अभियंता श्री. संतोष चव्हाण यांनी स्वत:च्या क्रमांकासह सहा शाखा अभियंत्यांची नावे व मोबाईल नंबरसह सोशल मिडियावर पोस्ट करुन आवाहन करण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी तथा नवीन ग्राहकांना त्यांच्यापर्यंत पोहोचणे सोपे झाले. कोणाकडे कोणती गावे येतात याचीही माहिती सोशल मिडीयावर दिली.

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही केले कौतुक

सोमेश्वर उपविभागाने केलेल्या कामाची दखल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही घेतली. श्री. चव्हाण यांचे कौतुक करत असेच अभिनव प्रयोग इतरांनीही करुन महसूल वाढीस चालना देण्याचे आवाहन सर्व अभियंत्यांना केले आहे.

मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे यांची मोलाची साथ

उपक्रमशिल अभियंत्याच्या पाठीमागे नेहमीच खंबीरपणे उभे राहणारे मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे यांनी सोमेश्वर उपविभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करत त्यांना नवीन कनेक्शनसाठी लागणारे वीज मीटर, पोल, तारा व इतर साहित्याची काहीएक कमी पडू दिले नाही. परिणामी सोमेश्वरला उपक्रम यशस्वीपणे राबविणे सोपे झाले. ■

'सोमेश्वर'ने काय केले ? सर्व कर्मचाऱ्यांना एकत्र केले. जेवढी घरे आहेत तेवढ्या जोडण्या आहेत का याची खात्री केली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वीजभार तपासला. मागेल त्याला व सहज वीज जोडणी दिली. ग्राहकांशी सातत्यपूर्ण संवाद साधला.



ग्राहकांच्या घरी नवीन मीटर जोडताना कर्मचारी

– श्री. विकास पुरी, जनसंपर्क अधिकारी, बारामती परिमंडल

कु. हर्षाली राजेंद्र पांडेची निवड

कु. हर्षाली राजेंद्र पांडे हिची वेल्स देशातील कार्डिफ विद्यापीठात एम. एस्सी. ''शाश्वत विकास'' या शिक्षणक्रमाकरिता निवड झाली आहे. एक वर्षाच्या या शिक्षणक्रमासाठी ती नुकतीच वेल्सला रवाना झाली. कु. हर्षालीने बी. आर्च हा शिक्षणक्रम भारती विद्यापीठ, खारघर येथून पूर्ण केला आहे. कु. हर्षाली ही प्रकाशगड या मुख्यालयात कार्यरत महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे यांची कन्या आहे. ■



▶▶ कु. हर्षाली राजेंद्र पांडे

अॅडव्हान्टेज विदर्भ प्रदर्शनातील महावितरणच्या दालनाला मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची भेट



मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

खासदार औद्योगिक महोत्सवाचा एक भाग म्हणून नागपुरात आयोजित अॅडव्हान्टेज विदर्भ प्रदर्शन आणि आयोजन नुकतेच करण्यात आले. व्यापार, वाणिज्य आणि गुंतवणुकीशी संबंधित विषयांचा ऊहापोह करणाऱ्या या प्रदर्शनात महावितरणतर्फे लावण्यात आलेल्या दालनाला नागरिकांचा उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला. राज्याचे मा.उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी देखील दालनाला भेट देत, तेथे उपस्थित अभियंत्यांसमवेत चर्चा केली.

या प्रदर्शनात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, छतावरील सौर ऊर्जा निर्मिती आणि औद्योगिक ग्राहकांसाठी नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या स्वागत कक्षाची विस्तृत माहिती छापील आणि दृकश्राव्य माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आली. नागरिकांनी विविध योजनांची माहिती घेत अनेक शंकांचे समाधान करुन घेतले.

नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, अधीक्षक अभियंते सर्वश्री अमित परांजपे व राजेश नाईक यांच्यासह अभियंत्यांनी प्रत्यक्ष संवाद साधून नागरिकांच्या विविध शंकांचे समाधान केले सोबतच महावितरणच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन देखील केले. या प्रदर्शनात सहभागासाठी विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन तर्फे महावितरणला स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले. ■

योजनांची कामे दर्जेदार व मुदतीत पूर्ण करा : संचालक श्री. प्रसाद रेशमे



आढावा बैठकीत बोलताना संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे व उपस्थित मान्यवर

संशोधित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतील विद्युत विकासाची कामे दर्जेदार व निर्धारित मुदतीत पूर्ण करा, असे निर्देश संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर व जालना येथे झालेल्या बैठकामध्ये श्री. रेशमे यांनी आरडीएसएस योजनेतील वाहिनी विलगीकरण, कुसुम-ब योजना, रिक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशन व प्रधानमंत्री सूर्योदय योजनेसंदर्भात आढावा घेतला. यावेळी मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) श्रीमती बीना सावंत, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण दरोली, जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. संजय सरग यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कंत्राटदार प्रतिनिधीही बैठकीस हजर होते. यावेळी योजनांत माईलस्टोनप्रमाणे किती कामे झाली, त्यात येणारे अडथळे, त्यावरील उपाय यावर चर्चा झाली. कोणत्याही योजनेच्या कामाच्या गुणवत्तेबाबत तडजोड करू नका, अशा स्पष्ट सूचना श्री. रेशमे यांनी कंत्राटदारांना दिल्या.

प्रधानमंत्री सूर्योदय योजनेत जिल्ह्यासाठी २५ हजार ग्राहकांना रूफ टॉप सोलर देण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच विविध योजनांच्या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रेल्वे, वन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध खात्यांशी समन्वय साधून ना-हरकत तातडीने प्राप्त करावी. तसेच वाहिनी विलगीकरणासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० मध्ये निवड झालेल्या उपकेंद्रांना प्राधान्य द्यावे. तसेच पैसे भरूनही ज्या शेतकऱ्यांचे वीज जोडणी प्रलंबित आहे, अशा शेतकऱ्यांना कुसुम-ब योजनेतून सौर कृषिपंप घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही श्री. रेशमे यांनी केले. ■

संचालक श्री. अरविंद भादिकर यांची प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रास भेट

संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रास नुकतीच भेट दिली. प्रशिक्षण केंद्राच्या विविध कामांचा त्यांनी आढावा घेत काही अनुषांगिक सूचना केल्या. प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रावर उपलब्ध सोई सुविधा यांची पाहणी करत केंद्रात सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे श्री. भादिकर यांनी कौतुक केले.

यावेळी केंद्रात सुरू असलेल्या विद्युत सहायक इंडक्शन बॅचला श्री. भादिकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उत्कृष्ट प्रश्न विचाणाऱ्या विद्युत सहायकांचा श्री. भादिकर यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री. दत्तात्रय बनसोडे, प्रशिक्षण केंद्राचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री.व्यंकटेश पेन्सलवार व इतर अधिकारी उपस्थित होते. ■



प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची पाहणी करताना संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर सोबत मान्यवर.

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडला



क्रीडा स्पर्धेचे ज्योत प्रज्वलित करुन उद्घाटन करतांना संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे, संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर व मान्यवर.

महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती परिमंडलाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळविला. कोल्हापूर परिमंडलास उपविजेतेपद मिळाले. संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर पार पडलेल्या स्पर्धेत सांघिक कार्यालयासह १६ परिमंडलांच्या संयुक्त ८ संघातील सुमारे दीड हजार कर्मचारी खेळाडूंनी सहभाग घेतला.

क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन :

स्पर्धेचे उद्घाटन संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून झाले. यावेळी सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी पोलिस बँडनेही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे, संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, प्रादेशिक संचालक (नागपूर) श्री.सुहास रंगारी उपस्थित होते. यावेळी मुख्य अभियंता सर्वश्री भुजंग खंदारे, कैलास हुमणे, परेश भागवत, सुनील काकडे, ज्ञानेश कुलकर्णी, दत्तात्रय पडळकर, अनिल डोये, सुंदर लटपटे, राजेंद्र पवार, दिलीप दोडके, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री.दत्तात्रय बनसोडे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री.भूषण कुलकर्णी, स्पर्धेचे मुख्य समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.संजय ढोके, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांच्यासह महावितरणचे वरिष्ठ अधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.

स्पर्धेचे उद्घाटक संचालक (संचलन) श्री.संजय ताकसांडे म्हणाले की, कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण व्हावी आणि त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळण्यासाठी ही स्पर्धा उत्तम संधी आहे. डॉ.सरवदे म्हणाले की, कर्मचाऱ्यांना महावितरण अशा स्पर्धा घेऊन चांगले काम करण्यास प्रेरणा देते, ही आनंदाची बाब आहे. नियोजन, संघटन आणि समन्वयाचे दर्शन या स्पर्धेतून घडते. तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ.केळे म्हणाले की, कर्मचाऱ्यांनी स्पर्धेतून नवीन ऊर्जा घेऊन त्याचा दैनंदिन कामात सकारात्मक उपयोग करावा.

स्पर्धा आयोजनाची संधी दिल्याबद्दल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचे कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिला कर्मचाऱ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. श्रीमती रूपाली पहूरकर व श्री. रमेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी श्री.ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार व्यक्त केले.

खेळातून कर्मचाऱ्यांना ऊर्जा देण्याचा उपक्रम स्तुत्य - डॉ. भागवत कराड



क्रीडा स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांचा सत्कार करताना केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड. सोबत संचालक श्री. अरविंद भादिकर व मान्यवर

वीजपुरवठ्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेस ऊर्जा देण्याचे काम महावितरण करते. त्याबरोबरच कर्मचाऱ्यांनाही क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून ऊर्जा देण्याचा महावितरणचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. कराड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, प्रादेशिक संचालक (पुणे) श्री. अंकुश नाळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.संजय ढोके यांची उपस्थिती होती.

यावेळी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांचा डॉ. कराड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संचालक श्री. भादिकर म्हणाले की, खेळाडूंनी नवीन प्रेरणा घेऊन आपल्या कामकाजात त्याचा उपयोग करावा हा स्पर्धेचा उद्देश आहे. स्पर्धेत निवास, भोजन, क्रीडांगण, वाहतूक आदी सर्वच प्रकारची व्यवस्था उत्तम दर्जाची होती. छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने अतिशय चांगले आदरातिथ्य केले, अशी प्रतिक्रिया खेळाडूंनी मनोगतात व्यक्त केले. ■

स विजेतेपद : कोल्हापूर परिमंडलास उपविजेतेपद

क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ :

छत्रपती संभाजीनगर येथील पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अशोका सभागृहात चारदिवसीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. सर्वाधिक पदके मिळविणाऱ्या पुणे-बारामती परिमंडलाच्या संघास सर्वसाधारण विजेतेपद देण्यात आले. कोल्हापूर परिमंडलास उपविजेतेपद देण्यात आले. संचालक (मानव संसाधन) श्री.अरविंद भादिकर यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष व छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, प्रादेशिक संचालक (पुणे) श्री. अंकुश नाळे यांची उपस्थिती होती. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सांघिक व वैयक्तिक खेळातील विजेते व उपविजेत्यांना सुवर्ण व रौप्यपदक तसेच प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी इतर संघ व उपस्थितांनीही टाळ्यांचा गजर व जल्लोष करीत विजेत्या संघांचे कौतुक केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक आस्थापना) श्रीमती सुचित्रा गुजर, मुख्य अभियंता सर्वश्री भुजंग खंदारे (प्रकल्प), राजेंद्र पवार (पुणे), परेश भागवत (कोल्हापूर), मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री.भारत पवार यांचीही उपस्थिती होती. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक डॉ. शिवाजी तिकांडे व श्री.श्रावण कोळनूरकर यांनी सूत्रसंचालन केले. जनसंपर्क अधिकारी श्री.ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार मानले. खेळाडूंतर्फे श्री.विकास आढे व श्रीमती जयश्री सरोदे यांनी प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले.

राज्यातील नाशिक-जळगाव, छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड, कल्याण- रत्नागिरी, सांघिक कार्यालय-भांडूप, नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, अकोला-अमरावती, पुणे-बारामती व कोल्हापूर अशा १६ परिमंडलांच्या ८ संयुक्त संघांतील जवळपास १५०० खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते.

सांघिक खेळांचे अंतिम निकाल (अनुक्रमे विजेता व उपविजेता) :

क्रिकेट - कोल्हापूर व कल्याण-रत्नागिरी, व्हॉलिबॉल - पुणे-बारामती व छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड, कबड्डी (पुरुष)- कल्याण-रत्नागिरी व कोल्हापूर, कबड्डी (महिला)- सांघिक कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती, खो-खो (पुरुष)- पुणे-बारामती व कोल्हापूर, खो-खो (महिला)- सांघिक कार्यालय-भांडूप व नाशिक-जळगाव, टेबल टेनिस (पुरुष)- कार्यालय-भांडूप व पुणे-बारामती, टेबल टेनिस (महिला)- अकोला-अमरावती व कल्याण-रत्नागिरी, बॅडमिंटन (पुरुष)- छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड व पुणे-बारामती, बॅडमिंटन (महिला)-नागपूर-चंद्रपूर-गोंदिया व पुणे-बारामती, कॅरम (पुरुष)- छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड व पुणे-बारामती, कॅरम (महिला)- कोल्हापूर व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, ब्रिज- छत्रपती संभाजीनगर-लातूर-नांदेड व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, टेनिक्वाईट महिला- पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया.

वैयक्तिक खेळांचे विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे (कंसात संघ) : १०० मीटर धावणे - पुरुष - साईनाथ मसने (सांघिक कार्यालय-भांडूप) व गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती), महिला - प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व मेघा झुंजारे (कल्याण-रत्नागिरी), **२०० मीटर धावणे - पुरुष** - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व साईनाथ मसने (सांघिक कार्यालय-भांडूप), **महिला** - प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व माया येळवंडे (पुणे-बारामती), **४०० मीटर धावणे - पुरुष** - गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) व विजय वारे (नाशिक-जळगाव), **महिला** - रिता तायडे (सांघिक कार्यालय-भांडूप) व भक्ती लोमटे (पुणे-बारामती), **८०० मीटर धावणे - पुरुष** - प्रतीक वाईकर (पुणे-बारामती) व परेश चौधरी (नाशिक-जळगाव), **महिला** - प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) व श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया), **१५०० मीटर धावणे - पुरुष** अबरार पटेल (नाशिक-जळगाव) व रामदास रोहनकर (अमरावती-अकोला), **महिला** - स्वाती दमाहे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व अर्चना भोंग (पुणे-बारामती), **५००० मीटर धावणे - पुरुष** एकनाथ घंगाळे (नाशिक-जळगाव) व प्रतीक वाईकर (पुणे-बारामती), ४ बाय १०० रिले **पुरुष** गुलाबसिंग वसावे, प्रतीक वाईकर, अक्षय केंगळे, सोमनाथ कंठीकर (पुणे-बारामती) व संभाजी जाधव, नरेश सावंत, शुभम निंबाळकर, प्रदीप वंजारी (कोल्हापूर), **महिला** - प्रिया पाटील, सारिका जाधव, प्रेरणा रहाटे, सोनाली मोरे (सांघिक कार्यालय-भांडूप) व रागिणी बेले, स्वाती दमाहे. प्रीती फुल्लुके, श्वेतांबरी अंबाडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया)

गोळा फेक - पुरुष - प्रवीण बोरावके (पुणे-बारामती) व इम्रान मुजावर (कोल्हापूर), **महिला** प्रियंका शेळके (नाशिक-जळगाव) व पूजा ऐनापुरे (कोल्हापूर), **थाळी फेक - पुरुष** - इम्रान मुजावर (कोल्हापूर) व अक्षय केंगळे (पुणे-बारामती), **महिला** - हिना कुरणे (पुणे-बारामती) व ज्योती कांबळे (कोल्हापूर), **भाला फेक - पुरुष** अमित पाटील (कोल्हापूर) व अक्षय केंगळे (पुणे-बारामती), **महिला** - अश्विनी जाधव (कोल्हापूर) व हर्षला मोरे (कल्याण-रत्नागिरी), **लांब उडी पुरुष** अमित हुमणे (कल्याण-रत्नागिरी) व अक्षय केंगळे (पुणे-बारामती), **महिला** संगीता पुंडे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) व माया येळवंडे (पुणे-बारामती), **उंच उडी - पुरुष** - चेतन केदार

(उर्वरित मजकूर पान ६ वर)



पुणे-बारामती परिमंडलाच्या विजयी संघांसोबत संचालक श्री. अरविंद भादिकर, प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे, श्री. राजेंद्र पवार व इतर वरिष्ठ अधिकारी.

अधिकाऱ्यांमध्ये रंगला प्रदर्शनीय क्रिकेट सामना



महावितरणच्या प्रदर्शनीय सामन्यात सहभागी झालेले सांघिक कार्यालय तसेच छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे खेळाडू.

राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेदरम्यान सांघिक कार्यालय तसेच छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यक्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संघांत प्रदर्शनीय क्रिकेट सामना रंगला. यात सांघिक कार्यालयाने विजय मिळवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर झालेल्या या मैत्रीपूर्ण सामन्यात सांघिक कार्यालयाचे नेतृत्व संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे यांनी तर छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक संघाचे नेतृत्व मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी केले. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत छत्रपती संभाजीनगरने निर्धारित १२ षटकांत ६ बाद ९२ धावा केल्या. यात कार्यकारी अभियंता श्री.अविनाश राऊत यांनी २०, श्री.महेश पाटील यांनी १०, अधीक्षक अभियंता श्री.संजय सरग यांनी ६, जनसंपर्क अधिकारी श्री.ज्ञानेश्वर आर्दड यांनी ५, प्रणाली विश्लेषक श्री.तौसिफ पटेल यांनी ७ धावांचे योगदान दिले.

मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे, अधीक्षक अभियंता सर्वश्री मोहन काळोगे, शांतीलाल चौधरी, नरेंद्र नारायणे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री.लक्ष्मीकांत राजेल्ली, उपसंचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री.सतीश कापडणी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सर्वश्री विश्वास पाटील, महेंद्र चुनारकर यांनीही फलंदाजी करून धावसंख्या वाढवण्यास हातभार लावला.

सांघिक कार्यालयाने १० षटकांत विजयी लक्ष्य गाठले. यात महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री.राजेंद्र पांडे यांनी ३३, मुख्य अभियंता श्री.भुजंग खंदारे यांनी १४, संचालक (प्रकल्प) श्री.प्रसाद रेशमे यांनी १३ धावा केल्या.

संचालक (मानव संसाधन) श्री.अरविंद भादीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.संजय ढोके, अधीक्षक अभियंता श्री.मिलिंद दिग्रसकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे विशेष कार्य अधिकारी श्री.मंगेश कोहाट, कार्यकारी अभियंता श्री.प्रसाद महातोळे, उपविधी अधिकारी सर्वश्री सुमेध कोलते, विजय हन्नावार, वरिष्ठ व्यवस्थापक श्री.बजरंग सूर्यवंशी, प्रणाली विश्लेषक श्री.कैलास देशमुख, अनुदेशक श्री.हसीब खान यांनीही विजयात महत्त्वाचा वाटा उचलला.

मुख्य अभियंता सर्वश्री सुनील काकडे, राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक श्री.तुषार भोसले यांनी पंचांची भूमिका पार पाडली. तर प्रादेशिक संचालक श्री.सुहास रंगारी व मुख्य अभियंता श्री.परेश भागवत यांनी समालोचन केले. ■

(मजकूर पान ५ वरून)

(नाशिक–जळगाव) व महेश नागटिळक (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), **महिला** – अश्विनी देसाई (कोल्हापूर) व सोनाली मोरे (सांघिक कार्यालय–भांडूप)

बुद्धिबळ – पुरुष नीलेश बनकर (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व स्नेहल चौधरी (सांघिक कार्यालय–भांडूप), **महिला** रंजना तिवारी (कल्याण–रत्नागिरी) व अमृता जोशी (सांघिक कार्यालय–भांडूप), **कॅरम – पुरुष** – अनंत गायत्री (सांघिक कार्यालय–भांडूप) व संजय कांबळे (पुणे–बारामती), **महिला –** पुष्पलता हेडाऊ (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व तेजश्री गायकवाड (सांघिक कार्यालय–भांडूप), टेनिक्वाईट – **महिला एकेरी** – मनीषा चौकसे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व अमृता गुरव (पुणे–बारामती), **महिला दुहेरी** – शीतल नाईक– कोमल सुरवसे (पुणे–बारामती) व प्रज्ञा वंजारी– समिधा लोहारे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), **टेबल टेनिस –** पुरुष एकेरी अतुल दंडवते (पुणे–बारामती) व मंगेश प्रजापती (सांघिक कार्यालय–भांडूप), **पुरुष दुहेरी** अतुल दंडवते–दीपक रोटे (पुणे–बारामती) व अविनाश पवार (कल्याण–रत्नागिरी), **महिला एकेरी** – स्नेहल बढे (अकोला–अमरावती) व रंजना तिवारी (कल्याण–रत्नागिरी), **महिला दुहेरी** – स्नेहल बढे–कोमल पुरोहित (अकोला–अमरावती) व अश्विनी शिंदे–सायली कांबळे (सांघिक कार्यालय–भांडूप), **बॅडमिंटन – पुरुष** एकेरी भारत वशिष्ठ (पुणे–बारामती) व पंकज पाठक (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड), **पुरुष दुहेरी –** पंकज पाठक दीपक नाईकवाडी (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड) व भारत वशिष्ठ – सुरेश जाधव (पुणे–बारामती), **महिला एकेरी** – ऋतिका नायडू (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया) व वैष्णवी गांगारकर (पुणे–बारामती), **महिला दुहेरी** – विदुला पाटील–चैत्रा पै (कोल्हापूर) व वैष्णवी गांगारकर–कमलरूख दारूखानवाला (पुणे–बारामती), ब्रिज – तेजस शहा–ललितदास देशपांडे (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड) व अनुप पंडित–विवेक मोरके (अकोला–अमरावती)

कुस्ती – ५७ किलो संभाजी जाधव (कोल्हापूर) व मतीन शेख (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड), **६१ किलो** – विनोद गायकवाड (अकोला–अमरावती) व शरद मोकळे (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड), **६५ किलो** – राजकुमार काळे (पुणे–बारामती) व योगेश मनोरे (नाशिक–जळगाव), **७० किलो** उत्तम पाटील (कोल्हापूर) व अनंत नागरगोजे (सांघिक कार्यालय–भांडूप), **७४ किलो** जोतिबा आऊलकर (कोल्हापूर) व चंद्रकांत दरेकर (पुणे–बारामती), **७९ किलो** सूरज बल्लाळ (कोल्हापूर) व अमोल मुंगडे (छत्रपती संभाजीनगर–लातूर–नांदेड), **८६ किलो** – शिवाजी कोळी (कोल्हापूर) व महेंद्र कोसरे (नागपूर–चंद्रपूर–गोंदिया), **९२ किलो** अमोल गवळी (पुणे–बारामती) व मोहन पेखाळे (नाशिक–जळगाव), **९७ किलो** महेश कोळी (पुणे–बारामती) व मुजाहिद अन्वर (अकोला–अमरावती) आणि **१२५ किलो** – भानुदास विसावे (नाशिक–जळगाव) व हणमंत कदम (कोल्हापूर). ■

ग्राहक सेवेला प्राधान्य द्या – श्री. अरविंद भादिकर



संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, मुख्य महाव्यवस्थापक श्री. दत्तात्रय बनसोडे यांचेसह उपस्थित प्रक्षिशणार्थी कार्यकारी अभियंते.

प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या ज्ञानाचा आणि माहितीचा उपयोग आपल्या दैंनदिन कार्यात विद्युत सुरक्षा संदर्भात महावितरणचे ग्राहक व कर्मचारी यांचेमध्ये जागरूकता निर्माण करा. विद्युत अपघात कमी करण्याकरिता सतर्क राहून विद्युत सुरक्षितता तसेच ग्राहकसेवेला प्राधान्य द्या. असे आवाहन संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी केले.

नाशिक रोड वरील ऊर्जा व्यवस्थापन आणि प्रशिक्षण संस्था येथे व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत नुकतेच पदोन्नती झालेले कार्यकारी अभियंते यांच्यासाठी आयोजित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात उदघाटक म्हणून श्री. भादिकर बोलत होते. यावेळी सुरक्षा व प्रशिक्षण केंद्र एकलहरे, येथील मुख्य महाव्यवस्थापक श्री. दत्तात्रय बनसोडे उपस्थित होते.

यासोबतच सुरक्षा व प्रशिक्षण केंद्र एकलहरे, येथील सभागृहात नाशिक परिमंडलाची मासिक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सुध्दा संचालक श्री. अरविंद भादिकर यांनी उपस्थित राहून विविध विषयाचा आढावा घेवून मार्गदर्शन केले. ग्राहक सेवेत कुचराई न करता मानकानुसार वेळेत सेवा द्या. दैंनदिन कार्यात समस्यांचे विश्लेषण करून प्राथमिकता ठरवा आणि योग्य नियोजन करा असे आवाहन संचालक श्री. भादिकर यांनी केले. यावेळी नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दीपक कुमठेकर यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. आढावा बैठकीला नाशिक परिमंडलातील सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते उपस्थित होते. ■

कार्यकारी संचालक (सु. व अं) पदी श्री. विनायक नरळे रुजू


श्री. विनायक नरळे

श्री. विनायक नरळे यांनी प्रकाशगड येथे नुकताच कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) पदाचा पदभार स्वीकारला.

श्री. नरळे हे जुनोनी गावचे सुपुत्र असून त्यांचे इंडस्ट्रीयल केमेस्ट्रीचे शिक्षण के.जे. सौमय्या कॉलेज, घाटकोपर, मुंबई येथे पूर्ण झाले आहे. श्री. नरळे यांनी सन २००९ पासून शासकीय सेवेत विविध पदांवर काम केले असून त्यांची २०१२ साली डीवायएसपी पदी निवड झाली आहे. यापूर्वी श्री. नरळे यांनी इचलकरंजी, दादर, अंबरनाथ, तुळीज येथे सेवा बजावली आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय येथे सन २०२१ च्या पोलीस भरतीत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. श्री. नरळे यांची पदोन्नतीने कार्यकारी संचालक (सु.व अं.) पदी नियुक्ती झाली आहे. ■

छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदी श्री. राहुल गुप्ता रूजू


श्री. राहुल गुप्ता

छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक पदाची सुत्रे श्री. राहुल गुप्ता यांनी नुकतीच स्वीकारली.

श्री. राहुल गुप्ता यांनी आयआयटी रोपर, पंजाब राज्य येथून इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग मध्ये पदवी संपादन केली आहे. तसेच ते २०१७ बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांनी गडचिरोली येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्य केले आहे व धाराशिव येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून उल्लेखनिय कामगिरी बजावली आहे. रूजू होताच त्यांनी अभियंत्यांची बैठक घेवून ग्राहकांचे प्रश्न व अनुषंगिक कृती आराखडा जाणून घेतला. ग्राहकांसाठी वॉर रूम अर्थात आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापण करण्याचा निर्णय घेतला आहे. ■

‘महावितरण’ला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा राष्ट्रीय पुरस्कार

नवीकरणीय ऊर्जेसाठीही दोन राष्ट्रीय पुरस्कारांचा मान



आयपीपीएआयचा पुरस्कार स्वीकारताना मुख्य अभियंता (देयके व महसूल) श्री. संजय पाटील आणि वीज दर नियामक कक्षाचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद दिग्रसकर.

जागतिक दर्जाची तत्पर व डिजिटल ग्राहक सेवा तसेच दर्जेदार वीज पुरवठ्यासाठी वितरण यंत्रणेतील आमुलाग्र सुधारणांची दखल घेत इंडिपेंडंट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (आयपीपीएआय) महावितरण कंपनीला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे. तसेच नवीन व नवीकरणीय ऊर्जेसाठी केलेल्या कामगिरीबद्दल प्रथम तर ग्राहकाभिमुख जनजागृतीबद्दल द्वितीय क्रमांकाच्या राष्ट्रीय पुरस्काराने महावितरणला गौरविण्यात आले. यासह वीज मिटरिंगसाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर केल्याबद्दल देखील महावितरणला विशेष पुरस्कार देण्यात आला.

आयपीपीएआयच्या वतीने बेळगाव (कर्नाटक) येथे आयोजित कार्यक्रमात पॉवर अवार्ड २०२४ चे विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय विद्युत प्राधीकरणाचे अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद, केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभागाचे सचिव श्री. भूपिंदरसिंग भल्ला, केंद्रीय विद्युत प्राधीकरणाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद देव यांच्याहस्ते मुख्य अभियंता (देयके व महसूल) श्री. संजय पाटील आणि वीज दर नियामक कक्षाचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद दिग्रसकर यांनी हे पुरस्कार स्वीकारले. या पुरस्कारांबद्दल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे स्वप्न मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना– २.० नुसार साकारले जात आहे. इतर राज्यांनी देखील या क्रांतीकारी योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास सुरु केला आहे.

केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने महावितरणला १९ जानेवारी २०२२ रोजी रूफ टॉप सोलार प्रोग्रॅम फेज –२ अंतर्गत १९ जानेवारी २०२४ पर्यंत दोन वर्षांमध्ये घरगुती ग्राहकांसाठी १०० मेगावॅटचे उद्दिष्ट दिले होते. महावितरणने हे उद्दिष्ट दि. २५ सप्टेबर २०२३ रोजी म्हणजे चार महिने आधीच पूर्ण केले आहे. ■

ग्राहकांच्या सुलभ सेवांसाठी महावितरण कटिबद्ध – श्री. संजय ताकसांडे

औद्योगिक ग्राहक हा महावितरणच्या महसुलाचा मजबूत कणा आहे. वीज पुरवठ्याच्या समस्येमुळे कोणत्याही उद्योगांना फटका बसू नये, ही महावितरणची प्राथमिकता आहे. तर उद्योजकांसह सर्वच वीज ग्राहकांच्या नवीन वीजजोडणी, वीजबिल तक्रारी इत्यादी सेवांमध्ये कोणतीही कमतरता नसावी असे ‘झिरो टॉलरन्स’ हे महावितरणचे धोरण असून त्यानुसार क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कामात अधिक सुसूत्रता व सुलभता आणावी. यात हलगर्जीपणा करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे सक्त निर्देश संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी दिले.

कल्याण मंडल एक आणि दोन कार्यालयांतर्गत सर्व औद्योगिक वीज ग्राहकांसाठी (कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, मुरबाड, शहापूर) कल्याण पश्चिमेतील तेजश्री इमारतीच्या तळमजल्यावर स्वतंत्र स्वागत कक्ष कार्यान्वित करण्यात आला. या सुसज्ज अशा स्वागत कक्षाचे उद्घाटन करताना संचालक (संचलन) श्री. ताकसांडे बोलत होते. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्षेत्रातील सर्वच औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींशी संचालक (संचलन) श्री. ताकसांडे यांनी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या.

संचालक (संचलन) श्री. ताकसांडे म्हणाले, जवळपास ३९ हजार कोटी रुपयांची तरतूद असलेल्या केंद्र सरकारच्या ‘आरडीएसएस’ योजनेतून राज्याच्या वीजपुरवठा यंत्रणेत अमुलाग्र बदल होणार आहेत. वीज वितरण क्षेत्रात देशातील सर्वात मोठी सार्वजनिक कंपनी म्हणून महावितरण समर्थपणे उभी असून वार्षिक एक लाख कोटी महसूलापर्यंतची मजल कंपनीने गाठली आहे. तर केंद्र सरकारने आदिम जमातींना वीज पुरवठा करण्यासाठी दिलेले उद्दिष्ट महावितरणने अवघ्या ३ आठवड्यात पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी केल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री अनिल घोगरे, निलकमल चौधरी, दीपक पाटील, दिलीप भोळे, संजय खंडारे, दिलीप खानंदे, महेश अंचिनमाने, संदीप पाटील, विजय मोरे, विविध औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी यांच्यासह अधिकारी, अभियंते, कर्मचारी उपस्थित होते.



स्वागत कक्षाचे उद्घाटन करताना संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे. समवेत मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर व इतर मान्यवर.

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574 & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार • उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)